JNU, NEW DELHI HAS UPLOADED THE JOURNAL IN UGC CARE PORTAL. (RTI)

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# GRAMIN BHAGATIL SHIKSHANBAHAYA VIDYARTHYANCHI DIRGHKALIN KUSHAL ROJAGAR VISHAYAK STHITI

Uday Gautam Athawale
Research Student
Dept. of Economics
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad MS

# "ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांची दीर्घकालीन कुशल रोजगारविषयक स्थिती."

संशोधक

**उदय गौतम आठवले**

एम. ए., एम. फिल. (अर्थशास्त्र.)

अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**गोषवारा–**

प्रस्तूत शोध–निबंधामध्ये ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांच्या रोजगारविषयक स्थितीचे अध्ययन करण्यात आलेले आहे. 'शिक्षणबाह्य विद्यार्थी' ही संज्ञा याठिकाणी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक पातळीवरील शिक्षण मध्येच सोडलेल्या मुला–मुलीकरिता उपयोगात आणली आहे. ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थी रोजगाराच्या शोधात शिक्षण सोडत असल्याचे दिसतात. मात्र त्यांना प्राप्त होणारा रोजगार हा तातपुरत्या स्वरुपाचा असल्याचे पाहावयास मिळते. तसेच शिक्षण सोडल्यानंतर विद्यार्थी जी कामे करतांना दिसतात ती कामे अकुशल स्वरुपाची असल्याचे दिसतात. कालांतराने त्यांच्यावर बेरोजगार होण्याची देखील वेळ येते. ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य मुलांच्या शाश्वत दीर्घकालीन रोजगाराची समस्याचा ऊहापोह प्रस्तूत शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे.

प्रस्तूत शोध–निबंध हा अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागाशी निगडीत असलेल्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांच्या रोजगारविषयक स्थितीपुरता मर्यादित आहे. याठिकांणी अकोला मधील ४ तालूक्यातून 'सहेतूक नमूना निवड पध्दतीच्या' माध्यमातून ५४ गावे निवडण्यात आली आणि तेथून गावातील लोकसंख्येच्या आधारावर २९५ शिक्षणबाह्य विद्यार्थी निवडण्यात आले. तसेच माहीती संकलन करण्याहेतू मुलाखत आणि अनूसुची चा प्रयोग करण्यात आला.

हा शोध–निबंध करण्यामागील मुख्य उद्देश हा ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या कुशल आणि अकुशल रोजगाराचे अध्ययन करुन त्याचा ग्रामीण जिवणमानावर कसा प्रभाव पडतो हे पाहणे आहे. शिवाय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शैक्षणिक पातळीवरील मध्येच शिक्षण सोडणाऱ्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांचे दीर्घकालीन कुशल रोजगारासंदर्भातील स्थिती कशी आहे याचे अध्ययन करणे हे आहे. शोध–निबंधाचे कार्य करित असतांना अध्ययनासंदर्भात एक परिकल्पना मांडण्यात आली त्यामध्ये, ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य मुला–मुलींना दिर्घकालीन कुशल रोजगाराच्या संधी कमी प्राप्त होतात. अशी ती परिकल्पना असल्याचे दिसून येते.

**प्रस्तावणा –**

देशातील ग्रामीण भागामध्ये शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भात भेडसवणारी सर्वात महत्त्वाची समस्या म्हणून "माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण पातळीवरुन विद्यार्थ्यांचे मध्येच शिक्षण सोडून जाणे." ही समोर आल्याचे दिसते. ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर माध्यमिक स्तरावरील शिक्षणाकरिता शैक्षणीक संस्थामध्ये नावनोंदणीच करित नाहीत. किंवा माध्यमिक शिक्षणामध्ये प्रवेश घेतला असता शिक्षण पुर्ण न करताच मध्येच अभ्यासक्रम पुर्ण न करता शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडतांना दिसतात. याला अनेक कारणे जबाबदार असल्याचे दिसतात त्यामध्ये काही महत्त्वाच्या कारणामध्ये, शासणाकडून प्राथमिक शिक्षण आत्मसात करण्याकरिता जेवढे सहकार्य प्राप्त होत असते तेवढे माध्यमिक शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसारामध्ये शासणाची भुमिका दिसून येत नाही. तसेच ग्रामीण भागामध्ये माध्यमिक स्तरावरील शिक्षण देणाऱ्या शैक्षणीक संस्था उपलब्ध नसणे, त्यात शिक्षणाकरिता आवश्यक असलेल्या सुविधांचा अभाव यासारखी अनेक शैक्षणीक संस्थेच्या बाबतीत कारणे शिक्षण सोडण्यास जबाबदार असल्याचे दिसतात. अधिक महत्त्वाचे म्हणजे मुळात ग्रामीण भागातील मुला–मुलींना उच्च शिक्षणाची आवडच नसल्याचे दिसते. आणि त्यांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती त्यांना शिक्षण सोडण्यास विवश करतांना दिसते.

'शिक्षणबाह्य विद्यार्थी' ही संकल्पना 'शाळाबाह्य विद्यार्थी' या संकल्पनेवर आधारीत आहे. शाळाबाह्य विद्यार्थी म्हणजे असे विद्यार्थी असतात जे प्राथमिक शिक्षणाकरिता पात्र असतांना देखील नावनोंदणी करित नाहीत आणि प्राथमिक शिक्षणामध्ये प्रवेश घेतला असता अभासक्रम पुर्ण न करता मध्येच जे शाळा सोडून जातात त्यांना 'शाळाबाह्य विद्यार्थी' म्हणून संबोधण्यात येते. याच धर्तीवर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण भारतीय शिक्षणव्यवस्थेमध्ये विविध प्रकारच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शैक्षणीक संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाते. या शैक्षणीक संस्थामधून शिक्षण पुर्ण न करता मध्येच शिक्षण सोडण्याऱ्या विद्यार्थ्यांना 'शिक्षणबाह्य विद्यार्थी' म्हणून संबोधल्या जाते. भारतीय शिक्षणपध्दतीमध्ये माध्यमिक पातळीवरील शिक्षणाच्या विकासावर फारसे लक्ष न दिल्यामूळे तसेच अपुऱ्या शैक्षणीक धोरणामूळे माध्यमिक पातळीवरील शिक्षणाचा ग्रामीण भागात प्रचार आणि प्रसार कमी झाल्याचे दिसते.

शिक्षण आणि रोजगार यांचा जवळचा संबध आहे. शिक्षीत अथवा विशिष्ट पात्रता असलेल्या व्यक्तीला सुरक्षीत आणि चांगल्या वेतनाचा रोजगार प्राप्त करण्यास जास्त अडचणी येत नाहीत मात्र, ज्या व्यक्तीचे शिक्षण झालेले नसेल आणि विशिष्ट कौशल्य वा अनूभव नसल्यास त्यांना रोजगार प्राप्त करण्यास अनेक अडचणी येतात. त्यांच्या रोजगाराची शाश्वती नसते शिवाय अशिक्षीत व्यक्तींना कमी मोबदल्यात कष्टाची कामे करणे भाग पडते कारण त्यांच्याकडे रोजगारांच्या फारशा

संधी उपलब्धच नसतात. मर्यादित क्षेत्रात त्यांना काम करणे भाग पडते. विशेषतः ग्रामीण भागातील काही कामे ही परंपरागत चालत आलेली असतात अशा ठिकाणी कौशल्याचा आपोआप विकास होत असतो मात्र हे प्रमाण खुप मर्यादित असल्याचे दिसते. ग्रामीण भागातील बहुतांश रोजगार हा अकुशल स्वरुपाचा असल्याचे दिसते. त्यात अधिकतर रोजगारा हा शेतीक्षेत्राशी निगडीत असल्याचा दिसतो. सुरवतीला शेतीक्षेत्रात काम करण्याकरिता शिक्षणाची फारशी गरज भासत नाही त्यामूळे शिक्षण सोडलेली अनेक विद्यार्थी याच क्षेत्रामध्ये कामाला सुरवात करतात. मात्र शेतीक्षेत्रातील काम हे हंगामानूसार चालत असते, शेतीतील कामे संपल्यानंतरा या विद्यार्थ्यांना दुसऱ्या कामाच्या शोधात जावे लागते अथवा त्यांचा बेरोजगारामध्ये समावेश होतो.

**संशोधन साहित्याचा आढावा–**

ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन कुशल रोजगार विषयक स्थितीचा आढावा घेत असतांना ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांची रोजगार विषयक स्थितीविषयक माहिती प्राप्त करण्याहेतू दुय्यम साहित्याची मदत घेण्यात आली. त्यामध्ये ग्रामीण भागातील रोजगाराविषयक स्थितीचे विश्लेषण केलेले विविध शोध–निबंध, शासकीय अहवाल तसेच शिक्षण आणि रोजगाराच्या संदर्भातील सहसंबध दर्शिविणाऱ्या संशोधन साहीत्याचे अध्ययन करण्यात आले. त्यात.

**डेवल्ट, एम. डब्लु. , ए. जे. शेफर्ट आणि पी. आर. कॅफ्री (२०००)** यांनी लॉस एन्जेलीस (अमेरीका) मधुन काढण्यात येणाऱ्या 'नॅशनल फोरम जनरल' ह्या नियतकालिकेमध्ये आपला शोध निबंध **"द. रिलेशनशिप बिटविन द ड्रॉपआऊट रेट ॲण्ड द अनएम्लॉयमेंट रेट."** या शिर्षकाने प्रसिध्द केला. या नियतकालिकेमध्ये त्यांनी प्रामूख्याने विद्यार्थ्याचे शिक्षण सोडण्याचा दर आणि बेरोजगारी यांच्यातील सहसंबध शोधून काढण्याचा प्रयत्न केला. बेरोजगारीचा दर अधिक आणि शिक्षण सोडण्याचा दर कमी असतांना त्यांना आपल्या अध्ययनात बेरोजगारी आणि शाळाबाह्य मुलांमध्ये –०.११६७ ($p=.043$) या स्वरुपाचा सहसंबध असल्याचा दिसून आला. मात्र ज्यावेळी शाळाबाह्य मुलांचा दर वाढला असता वस्तुनिर्माण क्षेत्रामध्ये रोजगारात वाढ झाल्याचे दिसून येते. वस्तुनिर्माण क्षेत्रातील रोजगारांची संख्या आणि शाळाबाह्यतेचा दर यांच्यातील सहसंबध काढला असता तो त्यांना ०.२७ ($p=000$) एवढा धनात्मक स्वरुपाचा असल्याचे दिसून आला.

**मोटकुरी, वेंकटनारायण. (२००४)** [७] यांनी **"ऑऊट ऑफ स्कुल चिल्ड्रेनः चाईल्ड लेबरस् ऑर एज्युकेशनली डेप्रिवेड."** या नावाने 'इकोनॉमीक्स ॲण्ड पॉलीटीकल विकली' या साप्तहिकामध्ये आपला शोध–लेख प्रसिध्द केला. यामध्ये त्यांनी बालमजूरी आणि शिक्षण यासंदर्भात आपले शास्त्रशुध्द विचार मांडले आहेत. त्यांच्या मते जेवढे बालमजुर हे काम करित आहेत ते सर्व शाळाबाह्य मुले–मुली आहेत. कारण बालमजुरांना शाळेत जाणे आवश्यक वाटत असले तरी देखील ते

शाळामध्ये जाऊ शकत नाही. सगळ्याच काम करणाऱ्या मुला–मुलींची शाळा सोडून काम करणे ही एक मजबूरी असते. असे असले तरी या शिक्षणबाह्य मुला–मुलींना प्राप्त होणारा रोजगार हा पुर्णतः सुरक्षित नसतो तसेच तो अधिकत्तर अकुशल स्वरुपाचा असतो.

**चेईस, लु. ,ग्राझीओसी, ग्रा. आणि पाऊली फ्रा. (२०१४)** [२२] यांनी (***Procedia Economics and Finance***) "प्रोसिडीया इकोनॉमीक्स अॅण्ड फाईनाअ्स" ह्या ऑनलाईन आंतराष्ट्रीय संशोधन नियतकालिकेमध्ये "***जॉब ऑपरच्युनिटी अॅण्ड अॅक्याडेमिक ड्रॉपआऊट: द केस ऑफ द युनिर्व्हसिटी ऑफ त्रियस्ते"*** या शिर्षकाखाली आपला शोध निबंध प्रसिध्द केला. त्यात त्यांनी इटली या देशामध्ये वास्तव्यास असणाऱ्या 'त्रियस्ते विद्यापीठातील' विद्यार्थ्यांची होणारी उच्च शिक्षणातील गळती आणि त्यांना प्राप्त होणाऱ्या कामांच्या संधी यातील संबध स्पष्ट केलेला आहे. त्यांच्या मते, इटली मधील विद्यापीठ मागास असण्याचे कारण म्हणजे तेथील मोठ्या संख्येने विद्यार्थी हे पदवी प्राप्त करण्याअगोदरच विद्यापीठ सोडतात. त्यांनी इटली येथील कामगार बाजारपेठेतील अटी तेथील परिस्थिती त्या स्वरुपाने होत असणारी विद्यापीठाची कामगीरी याची बारकाईने चौकशी केली अभ्यासक्रम पुर्ण न करता मध्येच शिक्षण सोडणारे विद्यार्थी बाजारपेठेच्या अटीचे पालन करु शकत नसल्याचे त्यांना दिसून आले.

**राठोड, जी. आर आणि कोळी, व्ही. एल. (२०१५)** [२८] यांनी मिळून आपला **"चाईल्ड लेबर अॅण्ड स्कुल ड्रॉप आऊट."** हा शोधनिबंध **'स्कॅार्लली रिसर्च जनरल फॉर इंटरडिसेप्लनरी स्टडी.'** ह्या ऑनलाईन आंतराष्ट्रीय नियतकालिकेमध्ये प्रसिध्द केला. ह्या शोध–निबंधाच्या माध्यमातून त्यांनी शाळाबाह्य विद्यार्थी आणि बालमजूरी यांचा संबध जेडण्याचा प्रयत्न केला. जी मुल–मुली शिक्षण घेत नाहीत आहेत ते बालमजुरीमध्ये गुंतलेले असल्याचे संशोधकास दिसून आलेत. त्यांना पुण्यामध्ये हॉटेल व्यवसायाची अधिक वृध्दी होतांना दिसून आली याठिकाणी कमी मोबदल्यात अधिक काळ काम करणाऱ्या अकुशल कामगारांची मागणी वाढली. पर्याय म्हणून शिक्षणबाह्य मुलाकडे हॉटेल मधील अकुशल स्वरुपाची कामे सोपविण्यात आली. शिक्षण सोडलेली मुली ३०० पैकी सर्वाधिक १९५ (६४%) उत्तरदाते हे केवळ प्राथमिक शिक्षणच घेतलेली होती. तर ६९ (२३%) उत्तरदात्यांनी आपले माध्यमिक शिक्षणापासून शिक्षण सोडलेले होते. यात ३५ (११.०७%) अशी मुले होती ज्यांनी कोणत्याही स्वरुपाचे शिक्षण घेतलेले नव्हते ती पुर्णतः निरक्षर होती.

**रॅम्सडल, ग्रो. ही., ब्रेगविक, स्वे. आणि व्यान, रॉ. (२०१८)** [३८] यांनी मिळून 'कॉन्जेट सायकॉलॉजी' यांच्या माध्यमातून **"लॉग्न –ट्रम ड्रॉपआऊट फार्म स्कूल अॅण्ड वर्क अॅण्ड मेंटल हेल्थ इन यंग अड्लट्स इन नार्वे : ए कॅालीटीटिव्ह इंटरह्युव –बेअ्स स्टडी."** या नावाने आपला शोध–निबंध प्रसिध्द केला. त्यात त्यांनी शिक्षण सोडल्यामूळे दिर्घकाळात त्या मुलांच्या मानसिक

आरोग्यावर तसेच त्याच्या कामावर काय परीणाम होतो यासंदर्भात त्यामध्ये संशोधन केले. त्यात त्यांना असे दिसून आले की, ज्या मुलांनी शिक्षण सोडले अशा मुलांना रोजगारासंदर्भातील खुप साऱ्या चांगल्या संधीवर पाणी सोडावे लागले. उच्च शिक्षणामूळे व्यक्तीला चांगल्यात चांगले जिवन जगण्याकरिता उच्च शिक्षणाद्वारे आवश्यक मदत मीळते; आणि जे विद्यार्थी मध्येच शिक्षण सोडतात ते तंबाखू, ड्रग्स, दारु तसेच आत्महत्या यासारख्या अनावश्यक बार्बीना बळी पडतात. त्यांना अध्ययनात असे दिसून आले की, विद्यार्थ्यांनी कामामूळे आपले शिक्षण सोडले मात्र काही कालावधी नंतर त्यांना आपले कामे टिकवून ठेवता आली नाही; सध्यःस्थितीत ते बेरोजगार आहेत.

**संशोधनाचा उद्देश –**

- ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या कुशल आणि अकुशल रोजगाराचे अध्ययन करणे.
- माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शैक्षणिक पातळीवरील मध्येच शिक्षण सोडणाऱ्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांचे दीर्घकालीन कुशल रोजगारासंदर्भातील स्थितीचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहितकृत्य –**

- ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य मुला–मुलींना दिर्घकालीन कुशल रोजगाराच्या संधी कमी प्राप्त होतात.

**संशोधन पध्दती–**

प्रस्तूत शोध–निबंधामध्ये वापरण्यात आलेल्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्याची माहीती ही २००८ ते २०१० या दहा वर्षाच्या कालावधीमध्ये शिक्षण सोडलेल्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांशी निगडीत आहे. ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांची दीर्घकालीन कुशल रोजगारविषयक स्थितीचे अध्ययन करित असतांना तसेच शोध–निबंधाचे उद्दिष्ट्ये साध्य करण्याहेतू पुढील वैज्ञानिक संशोधक पध्दतीचा उपयोग केला.

**नमून्याची निवडः –**

सदरील संशोधनाकरिता "संभाव्यता नमूना निवड (Probability Sampling Method) पध्दतीमधील" **स्तरीत यादृच्छिक नमूना निवड पध्दती** (Stratafied Random Sampling Method) चा उपयोग करुन अकोला जिल्ह्यातील ७ तालुक्यापैकी ४ तालुक्याची (अकोला, अकोट, मुर्तीजापूर आणि बाळापुर) निवड करण्यात आली. तसेच याच नमूना निवड पध्दतीचा उपयोग करुन या तालुक्यातील लोकसंख्येच्या आधारावर अकोला तालुक्यातील १४५ पैकी १६, अकोट तालुक्यातील

११४ पैकी १३ गावे, मुर्तिजापूर तालुक्यातील ११८ गावापैकी १४ गावे आणि बाळापुर तालुक्यातील ७९ गावापैकी ११ गावे अशी एकुण ५४ गावे ही नमूना म्हणून निवडण्यात आलीत.

तसेच नमूना म्हणून निवडण्यात आलेल्या ५४ गावामधून “गैर संभाव्यता नमूना निवड पध्दती (Non Probability Sampling Method) मधील **“साधा यादृच्छिक नमूना निवड पध्दतीचा”** (Simple Random Sampling Method) उपयोग करुन गावातील लोकसंख्येच्या आधारावर २९५ शिक्षणबाह्य मुला–मुलींची नमूना म्हणून निवड करण्यात आली. याकरिता ‘भारतीय जनगणना २०११’ चा आधार घेण्यात आला.

**संशोधन नमून्याचा आकारः –**

प्रस्तूत संशोधणाच्या उद्दिष्टाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण भागातील शिक्षणबह्य मुला–मुलींच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांच्या अध्ययनाकरिता समग्राचे गावातील लोकसंख्येनूसार ०५ (पाच) उपसमग्रामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

- ५ हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेले गाव.
- ३ ते ५ हजारापर्यत लोकसंख्या असलेले गावे.
- १ ते ३ हजारापर्यत लोकसंख्या असलेले गावे.
- ५०० ते १ हजारापर्यत लोकसंख्या असलेले गावे.
- २५० पेक्षा जास्त ते ५०० लोकसंख्या असलेले गावे

अशा एकूण लोकसंख्येच्या आधारावरील ०५ उपसमग्रामधून साध्या यादृच्छिक नमूना निवड पध्दतीच्या माध्यमातून ४५६ गावातून जवळपास १० टक्के गावाची म्हणजेच ५४ गावांची निवड करुन त्यातील एकुण **२९५ शिक्षणबाह्य मुल–मुली** यांच्याकडुन तथ्याविषयी माहीती प्राप्त करण्याहेतू नमूना म्हणून निवड करण्यात आली.

**लिंगनिहाय शिक्षणबाह्य विद्यार्थी संख्या –**

शोध निबंधामध्ये ग्रामीण भागातील शिक्षण सोडलेल्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांतील मुलांचा आणि मुलींचा कुशल रोजगारातील सहभाग आणि त्यांची रोजगारविषयक स्थिती पाहत असतांना लिंगनिहाय त्यांची संख्या माहित करुन घेणे महत्त्वाचे ठरते. त्यादृष्टीने तक्त्याच्या माध्यमातून शिक्षण सोडलेल्या इयत्तेनूसार लिंगनिहाय शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांची मांडणी करण्यात आली.

**तक्ता क्र. १.१ शिक्षण सोडलेल्या वर्गानूसार शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांची संख्या.**

| | | शिक्षणबाह्य मुला–मुलींची संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | **मुली** | **मुल** | |
| शिक्षण सोडलेला वर्ग | ८ वी | ३३ | ३३ | ६६ |
| | ९ वी | १४ | १५ | २९ |
| | १० वी | ५७ | ७२ | १२९ |
| | ११ वी | ८ | ५ | १३ |
| | १२ वी | २८ | ३० | ५८ |
| **एकुण** | | १४० | १५५ | २९५ |

स्त्रोत : प्रत्यक्ष नमूना पाहणी.

तक्ता क्र. अध्ययनाकरिता निवडण्यात आलेल्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शैक्षणीक पातळीवरुन शिक्षण सोडलेल्या शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांचा लिंगनिहाय आढावा घेण्यात आलेला आहे. तक्त्याचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, इयत्ता ८ वी मधून शिक्षण सोडलेली एकुण ६६ शिक्षणबाह्य विद्यार्थी नमूना म्हणून निवडण्यात आलेली आहेत तर त्यामध्ये ३३ मुल आणि ३३ मुली समान असल्याचे दिसतात. ९ व्या वर्गातून १४ मुली आणि १५ मुले असे एकूण २९ शिक्षणबाह्य विद्यार्थी निवडण्यात आलेले आहेत. १० व्या वर्गातून सर्वाधिक १२९ शिक्षणबाह्य विद्यार्थी निवडण्यात आलेत त्यामध्ये ५७ मुली आणि ७२ मुलांचा समावेश होतांना दिसतो. उच्च माध्यमिक शैक्षणिक पातळीवरील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांचा विचार केला असता ११ व्या वर्गातून १३ त्यात ८ मुली आणि ५ मुले निवडण्यात आली तर १२ व्या वर्गातून एकुण ५८ शिक्षणबाह्य विद्यार्थी निवडण्यात आली. त्यात २८ मुली आणि ३० मुले असे यादृच्छिक नमूना निवड पध्दतीने निवडण्यात आली. थोडक्यात अभ्यासाकरिता १४० शिक्षणबाह्य मुली आणि १५५ शिक्षणबाह्य मुले निवडण्यात आली.

**ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य मुला–मुलींची रोजगारविषयक स्थिती –**

मध्येच शिक्षण सोडलेली मुल–मुली आपल्या कुटुंबाची आर्थिक मदत करण्याहेतू जे काम सहजतेने उपलब्ध होईल असे कोणतेही काम करण्यास तयार असल्याचे दिसून येतात. त्यामूळे अशी मुल–मुली ‘अकुशल जास्त श्रम कमी वेतन’ असलेल्या कामामध्ये व्यस्त असल्याचे दिसतात. जी कामे त्यांना गावात राहुन करता येतात त्याकामाकडे ते अधिक आकर्षीले जातात. यांची शिक्षणाची पातळी कमी असल्याने त्यांना काम करण्याच्या चांगल्या संधी मीळत नाही. मात्र कुटुंबाच्या आणि त्यांच्या आर्थिक गरजा पुर्ण करण्याकरिता त्यांना काम करावे लागते अशा स्थितीत ही मुल–मुली शेती श्रेत्राशी निगडीत असलेल्या कामामध्येच अधिक व्यस्त असल्याचे दिसतात.

मुलींच्या काम करण्याच्या बाबतीत स्थिती जरा वेगळी दिसते. यातील बहुतांश मुली जरी शेती श्रेत्राशी निगडीत कामामध्ये व्यस्त असल्याचे दिसत असले तर घरात राहुन करता येणाऱ्या कांमान त्या अधिक पंसती देतांना दिसून येतात. याविषयीचे हे मध्येच शिक्षण सोडलेले मुल–मुलींची सध्यःस्थितीत रोजगार विषयक स्थिती कशी आहे याचे लिंगनिहाय विश्लेषण पुढील बहुचल सारणी मध्ये करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. १.२ लिंगनिहाय शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांची प्रमूख कामाची सध्यःस्थिती.**

| अ क्र. | | लिंगनिहाय शिक्षणबाह्य | | |
|---|---|---|---|---|
| | | मुली | मुले | एकुण |
| १ | आईस्क्रीम विकणे | ० | १ | १ |
| २ | अडत्यामधील काम करणे | ० | १ | १ |
| ३ | अंडी विकणे | ० | २ | २ |
| ४ | बि–बियाणे आणि शेतातील औषधीच्या दुकानात काम | ० | २ | २ |
| ५ | बांधकाम | १ | ७ | ८ |
| ६ | बचत गटातील कामे | १ | ० | १ |
| ७ | भाजीपाला विकणे | १ | ४ | ५ |
| ८ | बांबु, बल्याच्या दुकानात कामगार | ० | १ | १ |
| ९ | बांबुच्या टोपल्या, सुप (वस्तु) बनविणे | १ | ० | १ |
| १० | बँड वाजविणे | ० | १ | १ |
| ११ | बेरोजगार | ० | ५ | ५ |
| १२ | भंगार गोळा करणे | ० | २ | २ |
| १३ | ब्युटी पार्लर | ५ | ० | ५ |
| १४ | चहा विकणे | ० | २ | २ |
| १५ | औद्योगीक कंपनीत कामगार | १ | ४ | ५ |
| १६ | कटलरी | १ | ० | १ |
| १७ | दगड फोडणे | १ | ० | १ |
| १८ | दवाखाण्यात नोंदी करणे | ३ | ० | ३ |
| १९ | धान्याच्या दुकानात कामगार | ० | १ | १ |
| २० | दुध विक्री | २ | ४ | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | दुध काढणे | ० | १ | १ |
| २२ | झाडु बनविणे | २ | ० | २ |
| २३ | शेतमजुरी | ५२ | ३५ | ८७ |
| २४ | स्वतःच्या शेतातील कामे पाहणे | १ | ६ | ७ |
| २५ | फर्निचर बनविणे | ० | १ | १ |
| २६ | फुलांची विक्री | १ | ० | १ |
| २७ | गाई म्हशी चारणे | ० | ३ | ३ |
| २८ | गॅरेज मधील काम | ० | १ | १ |
| २९ | दुसऱ्यांच्या घरातील कामे | ६ | ० | ६ |
| ३० | घरातील/कुटुंबातील कामे | ३० | ० | ३० |
| ३१ | गुरा ढोरांचा सांभाळ करणे | ० | १ | १ |
| ३२ | हमाल | ० | १ | १ |
| ३३ | हातमाग | १ | २ | ३ |
| ३४ | हॉटेलमध्ये वेटर | ० | ६ | ६ |
| ३५ | जे. सी. बी. चालविणे | ० | १ | १ |
| ३६ | जंगली प्राणी पकडणे | ० | १ | १ |
| ३७ | काली–पीली चालविणे | ० | १ | १ |
| ३८ | कपड्यांच्या दुकानात काम | ४ | २ | ६ |
| ३९ | कपड्यांना इस्त्री करणे. | १ | १ | २ |
| ४० | खोदकाम | ० | २ | २ |
| ४१ | कीराणा दुकानात काम | २ | ३ | ५ |
| ४२ | कोळसा विकणे | ० | १ | १ |
| ४३ | लग्न संभारंभात स्वयंपाक बनविणे | १ | ० | १ |
| ४४ | लाकुडतोड | ० | १ | १ |
| ४५ | लोहकाम | २ | ० | २ |
| ४६ | पानटपरी | ० | ४ | ४ |
| ४७ | मळणी यंत्रावर काम | ० | २ | २ |
| ४८ | मसाला कुटणे | ३ | ० | ३ |
| ४९ | मासोळ्या विकणे | १ | ० | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५० | मटन शॉप वर काम | ० | १ | १ |
| ५१ | पाव, ब्रेड विकणे | ० | १ | १ |
| ५२ | पंक्चर काढणे | ० | ३ | ३ |
| ५३ | पाणीपुरी | ० | ३ | ३ |
| ५४ | पापड, डोवळ्या बनविणे | १ | ० | १ |
| ५५ | पीठाच्या गीरणीवर काम | ० | २ | २ |
| ५६ | रसवंती | ० | १ | १ |
| ५७ | रिक्षा चालक | ० | २ | २ |
| ५८ | सडक बनविणे | ० | ३ | ३ |
| ५९ | साफ सफाई करणे | ३ | २ | ५ |
| ६० | साडीला पीको फॉल करणे. | ५ | ० | ५ |
| ६१ | सलुन | ० | २ | २ |
| ६२ | गावातील सेतुमध्ये काम करणे | ० | २ | २ |
| ६३ | शिवणकाम | ५ | ० | ५ |
| ६४ | ट्रकचालक | ० | १ | १ |
| ६५ | ट्रक्टर चालक | ० | ३ | ३ |
| ६६ | वाहन चालक | ० | ६ | ६ |
| ६७ | वृत्तपत्र वाटणे | ० | २ | २ |
| ६८ | वेल्डींगचे काम | ० | १ | १ |
| ६९ | विटभट्टी | ३ | ७ | १० |
| | एकुण | १४० | १५५ | २९५ |

स्त्रोतः प्रत्यक्ष नमुना पाहणी.

तक्ता क्र. ३.८ मध्ये संशोधनाकरिता नमुना म्हणुन निवडण्यात आलेल्या २९५ शिक्षण सोडलेल्या मुला–मुलींचे शिक्षण सोडल्यानंतर सद्यःस्थितीत (१४०) मुली आणि (१५५) मुलांची रोजगारविषयक स्थिती कशी आहे याचे लिंगनिहाय विश्लेषण करण्यात आलेले आहे. मुली ह्या वेगळ्या क्षेत्रात आणि मुले हे वेगळ्या क्षेत्रामध्ये काम करतांना दिसतात काही क्षेत्रामध्ये दोघांचाही समावेश असल्याचे तक्त्यात पाहावयास मिळतो. त्यामूळे या तक्त्याच्या माध्यमातून शिक्षणबाह्य मुल आणि मुली यांची रोजगारविषयक स्थिती ही वेगवेगळी दाखविण्यात आलेली आहे.

तक्त्याच्या माध्यमातून शिक्षणबाह्य मुला–मुलींच्या रोजगाराविषयक विचार केला असता त्यांचा रोजगार हा आर्थिकदृष्ट्या फारसा बळकट असल्याचे दिसत नाही. यात १४० मुली (उत्तरदाते) पैकी

५२ मुली (३७.१ टक्के) या शेतमजुर म्हणुन काम करतांना दिसून येतात तर ३० मुली या स्वतःच्या घरी घरकाम वा कौटूंबिक कामे करतांना दिसतात. घरकम करणाऱ्या मुलींना कुटुंबाकडुन कोणताही आर्थिक मोबदला हा दिल्या जात नाही त्यामूळे अशा मुलींना बेरोजगार म्हणून संबोधने अधिक उचित ठरेल. घरकामामध्ये या मुलींना घरातील लहान मुलांची काळजी घेणे, स्वयंपाक करणे, घराची साफ–सफाई करणे, गुरांना चारा घालणे, कपडे धुणे, कधीमधी शेतातील कामे इत्यादी यासारखी कामे करावी लागतात. मुलांच्या तुलनेत मुलींना इतर क्षेत्रामध्ये रोजगारांच्या जास्त संधी असल्याचे दिसत नाही.

संशोधकास काही बाबतीत केवळ मुलींच काम करित असल्याच्या दिसल्यात त्याचा उल्लेख तक्त्यामध्ये करण्यात आलेला आहे. त्यात मसला कुटणे, मीर्ची पाऊडर तयार करणे तसेच हळदी पाऊडर निर्मीती अशा स्वरुपाचे काम ३ मुली करतांना दिसून येतात. लग्न संमारंभ असो वा इतर सार्वजनिक भोजन कार्यक्रमामध्ये जेवण बनविण्याचे काम १ मुलगी करतांना दिसते. लोहकामामध्ये आपल्या कुटुंबाला मदत करित असल्याचे २ उत्तरदात्या मुलींनी सांगीतले. बचत गटाच्या माध्यमातून आपण काम करित असल्याचे एका विवाहीत उत्तरदात्या मुलींने सांगीतले.

विशेषतः उत्तरदात्या शिक्षणबाह्य मुली ह्या ब्युटी पार्लर वर काम करणाऱ्या ५, कटलरी चालविणारी १, बांबुपासून टोपल्या, सुप यासारखी वस्तु बनिवणारी १, कुटुंबासोबत दगळ फोडण्याचे काम करणारी १, झाडु बनिवण्याचे काम करणारी २, फुलांची विक्री करणारी १, दुसऱ्यांच्या घरी घरकाम करणाऱ्या ६ मुली यासारखी कामे करतांना दिसून येतात. संशोधकास सर्वेक्षण करित असतांना अभ्यास वयोगटात बसणारी कमी वयात विधवा झालेली एक उत्तरदाता मुलगी मीळाली जी की, आपल्या उदरनिर्वाहकरिता मासोळ्या विकण्याचे काम करित असल्याचे दिसून येते. मुली या आपल्या घराबाहेर पडण्याऐवजी आपल्या घरातून काम करण्यास अधिक पसंती देतांना दिसून येतात. जसे की, घरीच पापड, शेवळ्या बनविण्याचे काम करणे तसेच शिलाई यंत्राच्या सहाय्याने बायकांचे कपडे शिवण्याचे ५ मुली काम करित असल्याचे तक्त्याच्या माध्यमातून दिसून येते.

शिक्षणबाह्य मुलांच्या बाबतीत त्यांची रोजगारविषयक स्थिती बघीतली असता त्यांतील बहुतांश मुलांना प्राप्त होणारे काम हे अकुशल स्वरुपाचे असल्याचे पाहावयास मिळते. यातील बहुतांश मुले हे शेती क्षेत्राशी निगडीत असलेल्या कामामध्ये असल्याचे आपणास पाहावयास मिळते. १५५ उत्तरदाते मुलांपैकी ३५ मुले ही शेतमजुरी करतांना दिसून येतात तर स्वतःच्या शेतामध्येच काम करणारी ६ मुले दिसून आलीत. याशिवाय बि–बियाणांच्या दुकानामध्ये २ मुले काम करतांना दिसतात. धान्याच्या दुकानामध्ये कामगार म्हणून १, दुधाची विक्री करणारे ४, गाई–म्हशीला चारा घालण्याचे काम करणारे ३ मुले ही शेती क्षेत्राशी निगडीत काम करतांना दिसतात.

याशिवाय इतर क्षेत्रात देखील ही शिक्षणबाह्य मुले (उत्तरदाते) काम करित असल्याचे तक्त्यामध्ये दिसते. त्यात आईस्क्रीम विकणारा १, अडत्यामध्ये काम करणारा १, गावामध्ये अंडी

विकणारी २, बांबु–बल्याच्या दुकानात काम करणारा १, बॅंड वाजविणारा , भंगार गोळा करणारे २, चहा विकणारे ४, फर्निचर (खुर्च्या, टेबल, खिडक्या, दारवाजे) बनिवणारा १, गॅरेज मध्ये काम करणारा १, हमाल म्हणुन काम करणारा १, जे. सी. बी चालविणारा १, जंगलातील प्राणी (रानडुक्कर) पकडणारा १, काली–पीली चालविणारा १, खोदकाम करणारे २, कोळसा विकणारा १, लाकुडतोड (लाकडी इंधन विकणे) करणारा १, शेतातील मळणी यंत्रावर काम करणारे २, मटन शॉप वर काम करणारा १, गावात पाव–ब्रेड विकणारा १, पंक्चर काढणारे ३, पाणीपुरी विकणारे ३, पीठाच्या गीरणीमध्ये काम करणारे २, रसवंतीवर काम करणारा १, रिक्षा चालविणारे २, सडक निर्माण कार्यात कामगार म्हणून ३, वेगवेगळ्या सलुन मध्ये केस कर्तन करण्याचे काम करणारे २, वेगवेगळ्या गावातील सेतुमध्ये काम करणारे २, ट्रक चालविणारा १, ट्रक्टर चालविणारे ३, वाहन चालक ६, वृत्तपत्र वाटणारे २, वेल्डींगचे काम करणारा १, पानटपरी चालविणारे ४ तसेच शहरी भागात हॉटेल मध्ये वेटर म्हणून काम करणारे ६ मुले असल्याचे दिसून येतात.

तक्त्यामध्ये अशीही काही क्षेत्रातील कामे दिसून येतात ज्यामध्ये मुल आणि मुली दोन्ही काम करतांना दिसून येतात. त्यात प्रामुख्याने शेतमजूरीचा समावेश केल्या जातो २९५ पैकी ८७ उत्तरदाते हे शेतमजुरी करतांना दिसतात. शेतमजुरीमध्ये मुली या प्रामुख्याने पेरणीमध्ये बि–बियाणे सोडणे, खत देणे, खुरपणे, कापुस वेचणे, शेंगा तोडणे यासारखी शारिरीकदृष्ट्या कमी ताकतीची कामे करतात. तर मुले पेरणी मध्ये बैलजोडी सांभाळणे, शेती तयार करणे, फवारणी, वखरणे, शेतीला पाणी देणे, शेताचे जंगली प्राण्यापासून राखण करणे तसेच सोंगणे (पीक काढणी) यासारखी कामे करतांना दिसून येतात. तक्त्यात आपण स्वतःच्या शेतामध्येच काम करित असल्याचे ७ उत्तरदात्यांनी सांगीतले त्यामध्ये १ मुलगी आणि ६ मुलांचा समावेश होतांना दिसतो. यासारखीच स्थिती विटभट्टीवर काम करणाऱ्या मुला–मुलींच्या बाबतीत लागू पडते, याठिकाणी १० मुल–मुली काम करतांना दिसतात त्यात ३ मुली आणि ७ मुलांचा समावेश होतांना दिसतो.

याशिवाय बांधकाम क्षेत्रामध्ये ८ उत्तरदाते काम करतात त्यात १ मुलगी आणि ७ मुले असल्याचे तक्त्यात दिसते. शहरी भागातील औद्योगीक कंपन्यामध्ये ५ मुल मुली काम करतात त्यात ४ मुले आणि १ मुलगी काम करतांना दिसते. हातमागाचे काम करणारे ३ उत्तरदाते आहेत ज्यात १ मुलगी आणि २ मुले आहेत. कपड्यांची इस्त्री करण्याचे १ मुलगी आणि मुलगा असे २ उत्तरदाते काम करतांना दिसून येतात. किराणा दुकानामध्ये काम करणारे ५ उत्तरदाते आहेत त्यात २ मुली ह्या आपल्या कुटुंबातील दुकानामध्येच काम करित असल्याचे दिसून आलेत मात्र या मुलींना त्या कामासंदर्भात कुठला मोबदला दिल्या जात नाही. ते आपल्या कुटुंबाची मदत करतात. तर ३ मुले ही वेगवेगळ्या किराणा दुकानामध्ये काम करित असल्याचे दिसून येतात. याशिवाय ५ उत्तरदाते हे साफ–सफाई करण्याचे काम करित असल्याचे तक्त्यात दिसुन येते त्यामध्ये ३ मुली आणि २ मुलांचा समावेश असल्याचे दिसते.

**शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांच्या रोजगाराचे स्वरुपः**

साधारणतः रोजगार दोन स्वरुपाचे असल्याचे दिसतात. त्यामध्ये एक कुशल स्वरुपाचा रोजगार आणि दोन अकुशल स्वरुपाचा रोजगार. हे रोजगारांचे स्वरुप करित असलेल्या कामावरुन निश्चित होत असते. 'कुशल रोजगारामध्ये अशा कामाचा समावेश होतांना दिसतो ज्यामध्ये नियमित होत असणाऱ्या कामापेक्षा अधिक जटिल शारीरिक अथवा मानसिक कार्य करण्याकरिता विशिष्ट ज्ञान, प्रशिक्षण आणि अनूभवाची गरज असते. कुशल कामगार हे सामान्यतः उच्च शिक्षण आणि प्रशिक्षणावर अवलंबून असते तसेच या कामाचा संबध हा उच्च वेतनशी आणि सुरक्षिततेशी जोडल्या जातो. याउलट 'अकुशल स्वरुपाचे कामे' असल्याचे दिसतात. त्याठिणी विशिष्ट कौशल्याची गरज पडत नाही. अधिक शिक्षण घेण्याची देखील गरज पडत नाही. मात्र याठिकाणी वेतन दर खुप कमी असतो आणि कामाच्या संदर्भात सुरक्षितता सुध्दा मिळत नाही. अकुशल स्वरुपाचे कामे दिर्घकाळ चालीत नाही. अकुशल स्वरुपाच्या कामात व्यस्त असणाऱ्या व्यक्तीवर केव्हाही बेरोजगार होण्याची वेळ येऊ शकते. अभ्यासाकरिता निवडण्यात आलेल्या शिक्षणबाह्य मुला–मुलींच्या रोजगाराविषयक आढावा घेतला असता यातील बहुतांश मुल–मुली हे अकुशल स्वरुपाची कामे करतांना दिसतात. याचा आढावा पुढील आलेखाच्या माध्यमातून घेण्यात आलेला आहे.

**आलेख क्र. १.१ शिक्षणबाह्य मुला–मुलीच्या रोजगाराचे स्वरुप.**




स्त्रोतः प्रत्यक्ष नमूना पाहणी.

आलेख क्र. ३.१६ मध्ये, शिक्षणबाह्य मुला–मुलींच्या वर्तमान स्थितीतील करित असलेल्या रोजगाराचे लिंगनिहाय स्वरुप मांडण्यात आलेले आहे. आलेखाचे अध्ययन केले असता असे दिसून येते की, एकुण २९५ शिक्षणबाह्य मुला–मुली पैकी २४० मुल–मुली अकुशल स्वरुपाचे कामे करतांना

दिसतात तर केवळ ५५ शिक्षणबाह्य मुल–मुली ग्रामीण भागातील कुशल स्वरुपाचे कामे करतांना दिसतात. त्यात मुलींचा विचार केला असता, १४० पैकी केवळ २७ मुली कुशल स्वरुपाची कामे करतांना दिसतात तर मुलांच्या बाबतीत १५५ शिक्षणबाह्य मुलापैकी केवळ २८ मुले कुशल स्वरुपाची कामे करतांना दिसतात उरलेले १२७ मुले अकुशल स्वरुपाची कामे करित असल्याचे दिसतात, तर काही मुलांना रोजगार नाही.

**गृहितकृत्याची पडताळणी. –**

**$H_0$ शिक्षणबाह्य मुला–मुलींना दिर्घकालीन (कुशल) रोजगाराच्या संधी कमी प्राप्त होतात.**

वरील परिकल्पना तपासण्याकरिता $\chi^2$ चाचणीचा उपयोग केला असून, आलेख क्र. ३.१७ मधील शिक्षणबाह्य मुला–मुलींच्या वर्तमान स्थितीतील 'रोजगाराचे स्वरुप' आणि 'शिक्षणबाह्य मुला–मुलींची संख्या' या दोन चलांना घेऊन $\chi^2$ चाचणी कार्यान्वित करण्यात आली. त्याची मुल्य पुढीलप्रमाणे आहेत,

$$\chi^2 = \sum \frac{(O-E)^2}{E} = ०.०७२$$

येथे, $\chi^2$ =चाचणीचे मुल्य.

O = निरीक्षण वारंवारीता.

E = अपेक्षीत वारंवारीता

∴ कोष्टक मुल्य $\chi^2$ = t ०.०५ = ३.८४१

मुक्ती संख्या = १.

तुलना, $\chi^2$( t ०.०५) = ३.८४१ > $\chi^2$ = ०.०७२

निष्कर्षः ०.०५ महत्त्वपातळीला १ मुक्तीसंख्या असतांना परिगणित $\chi^2$ चाचणी मुल्य ०.०७२ हे मुल्य दिलेल्या $\chi^2$ कोष्टक मुल्य ३.८४१ या मुल्यापेक्षा कमी असल्यामूळे वरील शुन्य परिकल्पना स्विकारली जाते.

थोडक्यात, शिक्षणबाह्य मुला–मुलींना (कुशल) रोजगाराच्या संधी कमी प्राप्त होत. असल्याची परिकल्पना ही स्विकारल्या जाते.

**विचारविमर्ष –**

प्रस्तूत शोध –निबंध हा ग्रामीण भागातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण सोडून गेलेल्या शिक्षणबाह्य मुलांची रोजगारविषयक स्थिती अभ्यासण्यापुरता मर्यादित आहे. यात अकोला जिल्ह्यातील ५४ गावामधून २९५ शिक्षणबाह्य विद्यार्थी निवडून त्याच्यांमाध्यमातून रोजगारविषयक स्थितीचे अध्ययन केलेले आहे. आलेले निष्कर्ष हे नमुन्याच्या माध्यमातून प्राप्त केलेले असले तरी ते सर्वच ग्रामीण भागातील रोजगारविषयक स्थितीचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने पुरेसे आहेत.

एकंदरित ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी हे कामाच्या शोधामध्ये शिक्षण सोडतांना दिसतात. त्यांना काही काळ काम देखील प्राप्त होते मात्र हे काम अनेकवेळा अकुशल स्वरुपाचेच असल्याचे पाहावयास मिळते. आलेख क्र. १.१ मध्ये ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य मुलांच्या रोजगाराचे स्वरुप दर्शिविण्यात आलेले आहे, त्यात २९५ पैकी केवळ ५५ (१८.६४ %) शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांना कुशल स्वरुपाचा रोजगार प्राप्त झाल्याचे दिसते. मात्र याउलट २४० (८१.३५ %) शिक्षणबाह्य विद्यार्थी अकुशल स्वरुपाची कामे करतांना दिसून येतात. हे प्रगतीच्या विरुध्द होत असलेली एक सामाजिक समस्या म्हणून धोरणकर्त्यांच्या समोर येणे गरजेचे आहे. जेणेकरुण उच्च पातळीवरुन या समस्येवर नियंत्रण आणता येणे शक्य होईल.

**निष्कर्षः**

एकंदरित प्रस्तूत शोध–निबंधात केलेल्या अभ्यासात ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांच्या रोजगारविषयक स्थिची आढावा घेत असतांना त्यांच्या रोजगारविषयक स्थितीचा उहापोह करण्यात आलेला आहे. त्यांच्या रोजगाराच्या स्वरुपावर ते कुशल आहे की अकुशल स्वरुपाचे यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. आणि या मुलांना शिक्षणापासून दुर ठेवण्यात रोजगाराची कितपत भूमिका आहे याचा देखील आढावा घेण्यात आलेला आहे.

- ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थी हे २९.४९ % शेतमजूरी करतांना आढळून आलीत.
- ग्रामीण भागातील शिक्षणबाह्य विद्यार्थ्यामध्ये कुटुंबातील कामे (विना मोबदला) ही मुलींना करावी लागतात त्यांचे प्रमाण १२.२० % असल्याचे दिसते. एकंदरित घरातील कामे करणे हे बेरोजगाराच्या वर्गामध्येच समाविष्ट होते.
- ग्रामीण भागात कुशल स्वरुपाच्या रोजगाराची कमतरता आहे, गावात अकुशल स्वरुपाचा शेतैक्षेत्राशी निगडीत रोजगार हंगामी स्वरुपात मिळतो.
- ८१.३५ % शिक्षणबाह्य विद्यार्थी अकुशल स्वरुपाचा रोजगारात गुंतलेले आहेत.
- शक्षणबाह्य विद्यार्थ्यांना दीर्घकालीन रोजगाराची शाश्वती नाही.

**उपाययोजना –**

- शिक्षणबाह्य विद्यार्थ्यांना मध्येच शिक्षण सोडता कामा नये याकरिता शिक्षक, पालक आणि शैक्षणिक अधिकांऱ्या सोबतच धोरणकर्त्यांनी लक्ष पुरवायला हवे.
- शिक्षण घेण्याच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या काम करण्यावर कायद्याने बंदी घालायला हवी.
- ग्रामीण भागात होत असणारे अल्पवयातील विवाह टाळायला हवेत. त्याचा सर्वाधिक प्रभाव हा मुलींच्या शिक्षणावर होऊन त्यांच्या रोजगारांच्या संधी देखील मर्यादित होत असल्याचे दिसतात. त्यादृष्टीने विवाहाच्या बाबतीत ग्रामीण भागात समुपदेशन करणे गरजेचे आहे.
- विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेण्यास रुची वाटावी तसेच त्यांच्यावर शिक्षणाकरिता आर्थिक बोजा पडू नये याकरिता शिक्षवृत्तीच्या माध्यमातून गरजूवंत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय करायला हवे.
- गावातील शेती श्रेत्रामध्ये आधूनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन कौशल्यावर आधारित शेती करायला हवी आणि त्याचे प्रशिक्षण हे शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून व्हायला हवे.
- ग्रामीण भागात शेती क्षेत्राशिवाय इतर प्रक्रियावर आधारीत रोजगार निर्मान क्षेत्रांचा विकस होणे गरजेचे आहे त्यामूळे गावात राहुन रोजगारविषयक शाश्वती निर्माण होण्यास मदत मिळेल.
- शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारीत कामाचे प्रशिक्षण द्यायला हवे, तसेच त्या कामाच्या मोबदल्यात त्यांना योग्य तो परतावा देखील द्यायला हवा.

**संदर्भ सूची –**

१) अत्तरदे, तो. पु. आणि पाटिल भ. रा. (१९५२). शिक्षणशास्त्र व जिवनपध्दती, डिजिटल पब्लिशर ऑफ इंडिया. https://archive.org/details/in.ernet.dli.2015.365869

२) राणी, जी. पी. (१९९९). ह्युमन डेव्हल्पमेंट इंडेक्स इन इंडियाः ए डिस्ट्रीक प्रोफाईल, अर्थविजन, गोखले इंस्टिट्युड ऑफ पॉलीटिक्स ॲण्ड इकोनॉमिक्स, पुणे. खंड ४१, अंक १. पृष्ठ क्र. ९–३०.

३) डेवल्ट, एम. डब्लु., ए. जे. शेफर्ट आणि पी. आर. कॅफ्री (२०००), **द. रिलेशनशिप बिटविन द ड्रापआऊट रेट ॲण्ड द अनएम्लॉयमेंट रेट,** नॅशनल फोरम जनरल, ४०० लॉक लेन सुट ९ /के एल, लेक चार्ली, एल ए ७६०५. पृष्ठ क्र. ०१ ते ०६.
https://citeseerx.ist.psu.edu/viewdoc/download?doi=10.1.1.535.9692&rep=rep1&type=pdf#:~:text=Almost%20600%20dropouts%20participated%20in,to%20the%20high%20school%20graduates.

४) मोटकुरी, वे. (२००४), **ऑऊट ऑफ स्कुल चिल्ड्रेनः चाईल्ड लेबरस् ऑर एज्युकेशनली डेप्रिवेड,** इकोनॉमीक्स ॲण्ड पॉलीटीकल विकली, ISSN- 2349-8846 (Online), पृष्ठ क्र. ४२९ ते ४२२१.

https://www.researchgate.net/publication/262124614_Out-of-School_Children_Child_Labourers_or_Educationally_Deprived

५) भारतीय जनगणना अहवाल (२०११), महारजिस्ट्रार एवं जनगणना आयुक्त कार्यालय, गृह मंत्रालय, भारत सरकार, न्यु दिल्ली.

**https://censusindia.gov.in/index_hindi.html**

६) महाराष्ट्र ह्युमन डेव्हल्पमेंट रिपोर्ट (२०१२), एस.ए.जी.ई. पब्लीकेशन इंडिया प्रा. लि. न्यु दिल्ली.

७) घोष, अ. (२०१४), इंडियन स्कुल एज्युकेशन सिस्टम, ब्रिटिश कॉन्सिल इंडिया.

८) चेईस, लु., ग्राझीओसी, ग्रा. आणि पाऊली फ्रा. (२०१४), **जॉब ऑपरच्युनिटी अ‍ॅण्ड अ‍ॅक्याडेमिक ड्रॉपआऊट; द केस ऑफ द युनिर्व्हसिटी ऑफ त्रियस्ते,** प्रोसिडीया; इकोनॉमीक्स अ‍ॅण्ड फाईनाअ्स, ISSN 2212-5671 (Online), पृष्ठ क्र. ६३ ते ७०.

https://www.sciencedirect.com/science/article/pii/S221256711400879X

९) राठोड, जी. आर आणि कोळी, व्ही. एल. (२०१५), **चाईल्ड लेबर अ‍ॅण्ड स्कुल ड्रॉप आऊट,** स्कॉर्लली रिसर्च जनरल फॉर इंटरडिसेप्लनरी स्टडी, ISSN: 2278-8808 (Online), खंड ०३, अंक १७, पृष्ठ क्र. ३१९९ ते ३२०७.

http://www.srjis.com/pages/pdfFiles/146710341437.%20Dr.%20G.R.%20Rathod_Mr.%20V.L.%20Koli.pdf

१०) सार्श, ई. ई. (२०१७), फॉरमल, नॉन–फॉरमल अ‍ॅण्ड इनफॉरमल लर्नींग: व्हॉट आर द डिफरन्स. लिटरसी, लॅन्गवेज अण्ड लिडरशीप, कॅनडा.

https://www.researchgate.net/publication/236222254_Formal_non-formal_and_informal_learning_What_are_the_differences

११) रॅम्सडल, ग्रो. ही., ब्रेगविक , स्वे. आणि व्यान, रॉ. (२०१८), **लॉग्न –ट्रम ड्रॉपआऊट फार्म स्कूल अ‍ॅण्ड वर्क अ‍ॅण्ड मेंटल हेल्थ इन यंग अड्लट्स इन नार्वे : ए कॉलीटीटिव्ह इंटरह्युव –बेअ्स स्टडी**, कॉन्जेट सायकॉलॉजी,नार्वे, खंड ०५, अंक ०१, पृष्ठ क्र. ०१ ते १६.

https://www.tandfonline.com/doi/full/10.1080/23311908.2018.1455365